ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 6 | FEBRUARY - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

मध्ययुगीन भक्तिमार्ग चळवळीतील स्त्रीयांचे योगदान

श्री.कोंढारे जे.व्ही.
इतिहास विभाग , श्री शिवाजी महाविदयालय बार्शी.
ता.बार्शी, जि.सोलापूर.

प्रस्तावना :-

आपल्या भारतीय वैदिक संस्कृतीत स्त्री ही देवतास्वरुप मानली जाते. देवी स्वरुपात तिचे पूजन केले जाते. आदिमाता, दुर्गामाता, महिषासूरमर्दिनी, महाकाला, महालक्ष्मी, पार्वती, महासरस्वती,महादेवी अशी हया स्त्रीदेवतांची अनेक रुपे आणि अनेक नावे आहेत.स्त्री ही सृजनाची शक्ती आहे. सर्व विश्वाची जननी आहे. ती पूजनीय आणि प्रार्थनीय आहे. आपल्या प्राचीन पुराणकाळातील अहिल्या,द्रौपदी,सीता,तारा आणि मंदोदरी हया देवतास्वरुप स्त्रिया प्रात:स्मरणीय मानल्या जातात. त्याचप्रमाणे अलिकडच्या कालखंडातील म्हणजे सतराव्या शतकापर्यंतच्या कालखंडातील पाच संतस्वरुप स्त्रियादेखील वंदनीय आहेत.

महानुभाव पंथातील चक्रधर स्वामींची शिष्या महदाइसा, संत निवृत्तीनाथंची धाकटी बहीण मुक्ताबाई, संत नामदेवांची दासी जनाबाई, संत तुकारामांची शिष्या बहिणाबाई आणि समर्थ रामदास स्वामींची शिष्या वेणाबाई हया पाच स्त्रियांही परमार्थमार्गातील संतपदाला पोहोचलेल्या तितक्याच आदरणीय आणि वंदनीय अशा स्त्रिया आहेत. हया स्त्री संत मालिकेत संत मुक्ताबाई ही मात्र सर्वश्रेष्ठ आणि अग्रणी आहे.

१)मुक्ताबाई :-

संत मुक्ताबाई हया संत ज्ञानेश्वरांच्या धाकट्या बहीण म्हणून सर्वांना परिचित आहेत. यांचा जन्म पुणे जिल्हयातील आळंदी देवाची येथे इ.स. १२७९ मध्ये झाला. संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर व संत सोपानदेव हे त्यांचे थोरले भाऊ, परंतु संत मुक्ताबाईचे स्वत:चेही स्वतंत्र अस्तित्व होते. त्यांनी रचलेले ताटीचे एकूण ४२ अभंग प्रसिध्द आहेत.

संत मुक्ताबाई हया योगी चांगदेवांच्या गुरु. मुक्ताई ही साक्षात आदिमायेचेच प्रकट रुप होती. इ.स. १२७९ ते १२९७ हया कालखंडातील मुक्ताईचे एकूण आयुष्य अवघे १६–१७ वर्षाचेच होते. परंतु एवढया अल्पायुष्यातही तिने ज्ञान प्राप्त करुन घेतले आणि ती संतपदावर आरुढझाली. इतक्या लहान वयातील तिची प्रतिभा आणि परमार्थ मार्गातील तिने मिळविलेले ज्ञान आणि उच्चपद हे स्तिमित करणारे आहे.

मुक्ताबाई ही निवृत्तीनाथ, ज्ञानदेव,सोपान या अलौकिक संतत्रिमूर्तीची तशीच अद्वितीय धाकटी बहीण, भावंडांमध्ये सर्वात लहान. हया भावंडांच्या आई–वडिलांनी म्हणजे विठ्ठलपंत आणि रुक्मिणीबाई यांनी देहत्याग केला तेव्हा मुक्ताई अवघी तीन–चार वर्षाची होती. सर्व प्रकारच्या प्रतिकूलतेचा प्रतिकार मुक्ताबाईचा आध्यात्मिक अनुभव थोर होता. ज्ञानेश्वरादी भावंडांमधील अस्मिता,स्वाभिमान, प्रतिकार यांचे सजीव रुप मुक्ताबाई होय. मुक्ताबाई आयुष्यातील प्रत्येक प्रसंगांना निर्भयपणे खंबीरपणे सामोरी जात. विवेक तर मुक्ताबाईत द्धढपणे विसावलेला. म्हणून जेव्हा जनसमाजाकडून प्रत्येकवेळी होणारी उपेक्षा व अपमान सहन न होऊन, ज्ञानेश्वर जेव्हा उद्विग्न स्थितीवर मात करावी म्हणून पर्णकुटीची ताटी (दार) बंद करुन ध्यानस्थ बसले. त्यावेळी केवळ नऊ वर्षाची लाडीवाळ मुक्ताबाई

कर्तव्यदक्ष पित्याची कठोर जबाबदारी आत्मविश्वासाने पेलून आपल्या वत्सल अभंगवाणीने ज्ञानदेवांना उद्देशून योग्याची लक्षणे कथन करते. दु:खी अपमानित ज्ञानदेवांचे ताटीच्या अभंगात सांत्वन करते.

ताटीच्या अभंगात मुक्ताबाईचे हळुवार, समंजस, प्रसंगावधानी, उच्च पातळीवरचे व्यक्तिमत्व साकार झाले आहे. त्यात मुक्ताबाईनी जी संतत्वाची लक्षणे सांगितली आहेत, ती मूर्तिमंत तिच्या व्यक्तित्वात दिसून येतात.

संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांनी श्री क्षेत्र आळंदी येथे संजिवन समाधी घेतल्यानंतर सोपानकाका सासवडला समाधिस्त झाले. नंतर नेवासा, आपेगाव, पुणतांबे, पैठण, घृणेश्वर, पहुर, जामनेर, बोदवड मार्गे ही संत मंडळी सर्व मुक्ताईनगर (जिल्हा जळगाव) येथे आले असता १५ दिवस मुक्ताईनगर कोथळी परिसरात वास्तव्य करुन मुक्ताई स्व–स्वरुपकार झाल्या. त्याच मुक्ताईच्या पावन भुमीमध्ये मुक्ताई समाधी स्थळ व प्रगट स्थान म्हणून भव्य मंदिर आहे.

२)मीराबाई :-

संत मीरा या मध्ययुगीन भारतातील एक श्रेष्ठ कृष्णभक्त संत कवयित्री. त्याचा अर्थ 'श्रेष्ठ', 'श्रीमंत' असा आहे. त्यांचा जन्म राजस्थानातील नागर जिल्हयातील कुडकी गावात एका राजपूत कुटुंबात झाला. राव दुदाजी हे मीराबाईचे आजोबा तर मेडतिया जहागिरीचे राठोड असलेले रतनसिंह हे वडील.राव दुदाजी मंडसौर वसविणा–या मांडोरच्या राव जोधाजी यांचे पुत्र.

बालपणीच झालेल्या मातृवियोगामुळे वैष्णव भक्त असलेल्या राव दुदाजी यांच्या छत्राखाली मीराचे बालपण गेले. एका आाख्यायिकेनुसार, लग्नाची एक वरात बघून मीरेने आईला विचारले, की माझा पती कोण होणार?आईने तिला घरातील कृष्णाच्या मूर्तीपुढे नेले आणि हा तुझा पती असे सांगितले. तेव्हापासून मीरा मूर्तीप्रेमी बनली. तिने या मूर्तीशी स्वत:चे लग्न लावले. असेही सांगितले जाते. लहान वयातच चित्तोडच्या राणा संगांचा पूत्र असलेल्या भोजराज याच्याशी मीरेचा विवाह ठरला. कृष्णाशी लग्न झाले आहे, असे मानीत असल्याने मीरेला हा विवाह पसंत नव्हता. नव्या घराच्या कुलदैवताची उपासना करण्यास तिने नकार दिला. १५२७ मध्ये एका लढाईत भोजराज मारला गेला. वयाच्या विशीत मीरेने पाहिलेल्या मृत्यूच्या मालिकेचा हा एक भाग होता. क्षणभंगूर गोष्टी सोडून शाश्वताकडे तिने लक्ष देण्यास सुरुवात केली आणि दु:खाचे रुपांतर निस्सीम आाध्यात्मिक भक्तीत केले. विरहाने पोळलेल्या मनाची अवस्था वर्णन करणारी तिची भजने याची साक्ष देतात. सुरवातीला मीरेचे कृष्णप्रेम ही खासगी बाब होती. पण नंतर ती अत्यानंदाने शहरातील रस्त्यांवर नाचू लागली. चित्तोडचा नव्याने राज्यकर्ता बनलेला विक्रमादित्य हा तिचा दीर तिच्या या वागण्यावर आक्षेप घेऊ लागला. मीरेला विषबाधा करविण्याचे अनेक प्रयत्न विक्रमादित्याने केले असे म्हटले जाते. गुजरातमधील द्वारका इथे तिने आयुष्याची अखेरची वर्षे घालविली. त्यानंतर द्वारकाधीशाच्या मूर्तीत मीरा विलीन झाली. नाभादास, प्रियादास, धुवदास, मलुकदास, हरिराम व्यास इ.संतचरित्रकारांनी व संतांनी मीराबाईबद्दल अत्यंत आदराने गौरवोद्गार काढले आहेत.मध्ययुगीन राजस्थानी, गुजराती व हिंदी साहित्यात संत कवयित्री म्हणून मीरेचे स्थान अनन्यसाधारण आहे.

३)वेणाबाई:-

संत वेणाबाई यांचा जन्म इ.स. १६२७ मध्ये झाला. त्या मुळच्या मिरज येथील देशपांडे यांच्या कन्या. विवाहानंतर कोल्हापूरला गेल्या व काही काळातच, वयाच्या दहाव्या वर्षी विधवा झाल्या. तेथेच त्यांनी समर्थ रामदासांचे शिष्यत्व स्वीकारले. नंतर त्या मिरज येथे परत आल्या. समर्थांनी त्यांना कीर्तन करण्याची अनुमती दिली होती. त्या मध्ययुगीन काळात विधवा स्त्रीने कीर्तन करणे ही एक क्रांतीच होती. मळलेली वाट सोडून समाजाच्या उद्धारासाठी क्रांतिकारक पाऊल उचलणा–या सर्वच संतांना जननिन्देला सामोरे जावे लागते. समर्थ त्याला अपवाद नव्हते. वेणाबाई, अक्काबाई, अंबिकाबाई या स्त्रियांना त्यांनी अभ्यासास प्रवृत्त केले. वेणाबाईना तर खूप त्रास सहन करावा लागला. त्यांचे समर्पण म्हणजे एक कसोटीच होती. कोल्हापूर हे त्यांचे माहेर तर मिरज हे सासर होते. समर्थ मिरजेला आणि कोल्हापूरला नेहमी जात. तिथे त्यांची नेहमी कीर्तने होत. वेणाबाई त्यांच्या कीर्तनांना आवर्जून जात.सासू–सासरे एकनाथ महाराजांचे अनुगृहीत होते. त्यामुळे घरातून कोणताच विरोध नव्हता. समर्थ प्रत्येक रामनवमी उत्सवाच्या आधीनिवडक शिष्य घेऊन भिक्षेसाठी जात असत. त्या काळात एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीला चाफळात ठेऊन उत्सवाची सर्व जबाबदारी त्याच्यावर सोपविली जात असे. एक वर्ष ही जबाबदारी वेणास्वामींच्यावर

सोपविण्यात आली. नेतृत्वाचे गूण प्रत्येक माण्सामध्ये असतात. विशिष्ट पद्धतीने त्याचा विकास घडवून आणावा लागतो. वेणाबाईनी मठाची जबाबदारी स्वीकारली. समर्थानी पाठवलेली भिक्षा कोठीघरात व्यवस्थित लावून ठेवणे अशी विविध कामे करावी लागत. रामरायाची ही सेवा वेणाबाई मनापासून करीत असत. त्यांना त्यांच्या सेवेची पावती दयावी.असे रामचंद्रांच्या मनात येऊन गेले. ऐन उत्सवाच्या १५ दिवस आधी वेणाबाई आजारी पडल्या. त्या तापाने एवढया फणफणल्या की, त्यांना चालताही येईना. ज्याप्रमाणे नाना रुपे धारण करुन संत जनाबाई, संत एकनाथ, या संतांची सेवा केली त्याप्रमाणे रामचंद्रांची रामबाईच्या रुपात येऊन उत्सवाची सर्व तयारी केली. मी बत्तीस शिराळयाची असून रामदास स्वामींनी मला तुमच्या मदतीसाठी पाठविले आहे. असे रामाबाईनी वेणाबाईना खोटेच सांगितले. समर्थ भिक्षेहून परतल्यावर सर्व गोष्टीचा उलगडा झाला आणि रामाबाई ही गुप्त झाल्या अशी आख्यायिका सांगितीली जाते.

वेणाबाईची समाधी सज्जनगड येथे आहे. रामदासस्वामींनी इ.स. १६५६ मध्ये बांधलेला वेणाबाईचा मठ मिरज येथे आहे.

४)बहिणाबाई :-

संत कान्होपात्रेखेरीज विठ्ठलाला संपूर्ण समर्पित झालेली स्त्री संत म्हणजे संत बहिणाबाई. स्त्री संत मालिकेतील अग्रेसर मुक्ताबाई, कान्होपात्रा, जनाबाई, वेणाबाई, आक्काबाई, मीराबाई यांसह बहिणाबाईचे स्थान मानावे लागेल. बहिणाबाईचा जन्म वैजापूर तालुक्यातील देवगांव येथे शके १५५१ मध्ये ब्राम्हण कुटुंबात झाला. त्यांच्या आईचे नाव जानकी व पित्याचे नाव आऊजी. माता–पित्यांनी तिचा विवाह वयाच्या पाचव्या वर्षी त्याच गावातील पाठक कुटुंबात लावला. संत बहिणाबाईना लहानपणापासूनच परमार्थाची व भक्तीची ओढ होती.कथा, कीर्तने,पुराण–श्रवण आणि सतपुरुषांची सेवा यात संत बहिणाबाई रमली होती. पण तिची संसारावरील आसक्ती कमी होवून परमार्थीक वृत्ती वाढत गेली. घरची गरीबी, शिक्षणाचा अभाव, तरीही समाधानी वृत्ती व संतवृत्तीला साजेशी पांडूरंगाची ओढ मनात होतीच.शेतात काम करीत असतानाही हा भक्तिभाव अभंगाचे रुपाने तिच्या मुखातून बाहेर पडत होता.पुढे कोल्हापूर वास्तवायात जयराम स्वामीच्या कथा कीर्तनाने संत बहिणाबाईच्या मनावर प्रभाव पडला.ती रोज तुकोबाचे अभंग म्हणू लागली व तुकोबाचे दर्शनाचा ध्यास घेतला. तिला तुकोबारायांना सदगुरु करुन त्यांच्याकडून अनुग्रह व आर्शिवाद घ्यावयाचा होता. म्हणून रात्रंदिवस तुकोबाचे अभंग म्हणत त्यांचे ध्यान करु लागली. शेवटी कार्तिक ५शके १५६९ रोजी तुकोबारायांनीयेवून गुरुपदेश दिला. बहिणाबाईचे सारेजीवन गुरुबोधामुळे बदलून गेले.तिने आपले गुरु संत तुकाराम महाराज व त्यांचीही गुरुपरंपरा आपल्या अभंगांत वर्णन केले आहे.

संत बहिणाबाई यांनी सुमारे ४७३ अभंगांची रचना केली आहे. आणि शके १७०० मध्ये संत बहिणाबाई समाधिस्थ झाल्या.

५)जनाबाई :-

संत नामदेवांच्या सहवासात जनाबाईनीही विठ्ठलाच्या भक्तीचा ध्यास घेतला होता. संत नामदेव हेच त्यांचे पारमार्थिक गुरु होते.श्री संत ज्ञानदेव–विसोबा खेचर, संत नामदेव, संत जनाबाई अशी त्यांची गुरुपरंपरा आहे. संत ज्ञानदेवांच्या प्रभावळीतील सर्व संतांना त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेले आहे.

'विठू माझा लेकुरवाळा, संगे गोपाळांचा मेळा।।' हा प्रसिध्द अभंग जनाबाईचाच आहे. त्यांना संत नामदेवांमुळे सतत संत–संग घडला होता.

संत ज्ञानदेवांविषयीही त्यांचा भक्तिभाव अनन्यसाधारण होता. गौ–या वेचतांना, घरातील इतर कामे करत असताना त्या सतत देवाचे नामस्मरण करत असत.

संत जनाबाईच्या नावावर असलेले एकूण सुमारे ३५० अभंग सकल संत गाथा या ग्रंथात मुद्रित झाले आहेत. त्यांचे अभंग कृष्णजन्म, थाळीपाक, प्रल्हादचरित्र, बालक्रीडा या विषयांवर आहेत. हरिश्चंद्राख्यान नामक आख्यानरचनापण त्यांच्या नावावर आहे. संत जनाबाईच्या थाळीपाक व द्रौपदी स्वयंवर या विषयांवरील अभंगांनी महाकवी मुक्तेश्वरांना (संत एकनाथांचे नातू)स्फूर्ति मिळाली होती.

संत जनाबाईची भावकविता ही भगवंताच्या प्रेमाने ओतप्रेत भरलेली आहे. पूर्ण निष्काम होऊन लौकिक, ऐहिक भावना विसरुन त्या विठ्ठलाला शरण गेलेल्या आहेत.आत्मज्ञानाचा साक्षात्कार घडण्यापूर्वीच त्या निर्विकार

झाल्या आहेत. संत जनाबाईच्या जीवनातील अनंत अनुभूती त्यांनी त्यांच्या रचनांतून रेखाटल्या आहेत. संत नामदेवांवरील भक्ति–प्रेमभाव, संत ज्ञानदेवांविषयी असलेला उत्कट भाव, संत चोखोबांच्या भावसामर्थ्याचे अनुसरण, तसेच विठ्ठलाविषयीचा भक्तिभाव त्यांच्या काव्यात ओतप्रोत भरलेला दिसून येतो. वेळप्रसंगी देवाशी भांडायला पण त्या कमी करत नाहीत. 'वात्सल्य, कोमल ऋतुजा, सहनशीलता,त्यागी वृत्ती, समर्पण वृत्ती, स्त्री विषयीच्या भावना संत जनाबाईच्या काव्यात प्रकर्षाने दिसून येतात,' असे ज्येष्ठ अभ्यासक रा.चिं.ढेरे हे जनाबाईच्या काव्याचे रसग्रहण करताना म्हणतात.तत्कालीन संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत सोपान, संत गोरा कुंभार,संत चोखामेळा, संत सेना महाराज आदि सत्पुरुषांच्या जीवनाचा, सदगुणांचा आढावा घेणारी पद्यरचना करुन संत जनाबाईनी पुढील पिढयांवर एकप्रकारे उपकारच करुन ठेवले आहेत.त्यांची भाषा सर्वसामान्य माणसांच्या हदयाला जाऊन भिडते.संत जनाबाईचे बरेचसे अभंग नामदेव गाथेमध्ये आहेत.

संत जनाबाई श्री क्षेत्र पंढरपूर येथे महाद्वारी, आषाढ कृष्ण त्रयोदशी शके १२७२ या दिवशी समाधिस्थ होऊन पांडुरंगात विलीन झाल्या.

याशिवाय लल्लेश्वरी,शबरीबाई,दिवालीबाई,जनीबाई व हट्टीविदयालंकार या स्त्रीया ही याच भक्तीमार्ग चळवळीतील तसेच मध्ययुगात इस्लाम धर्मातही ही चळवळ असल्याचे दिसून येते, यातील सुफीसंत स्त्रीया बीबी जमाल,व जहानआरा ही या परंपरेतीलच होय,

सारांश –

अनेक प्रवाहांनी बनलेली भक्तीमार्ग चळवळ होती. त्यात प्रांतानुसार विविधता असली तरी त्यातून स्त्री–स्वातंज्याची व मुक्तीची धडपड सातत्याने दिसते. या संत स्त्रिया देशाच्या विविध भागांमधून उदयास आल्या, स्त्री संतांच्या लिखाणातून संवेदनशीलता व चित्त विचलित करणा–या भावना दिसतात. संत स्त्रियांच्या कार्याची जमेची बाजू म्हणजे सामान्य स्त्रिया गृहस्थाश्रमातून राहत. तरीही त्यांना आध्यात्मिक जीवनाचा दर्जा मिळाला. पत्नी,माता या भूमिकेतही हा दर्जा मिळाला. प्रस्थापित धर्माला त्यांनी आव्हान दिल्यामुळे त्यांना त्रास सहन करावा लागला. तरीही त्यांनी ब–याचदा सामाजिक विषमता व अत्याचारी सामाजिक परंपरा, चालीरीती यांच्याविरुद्ध बंड केले नाही म्हणजेच स्वत:ला सामाजिक मुक्तिदाता न समजता व्यक्तिगत स्वातंज्य मिळविण्याचे प्रयत्न केले.

संत कवयित्रीच्या भक्तिकाव्यातून धर्म आणि चालीरीती याबाबत अनेक प्रश्न त्यांनी उभे केले. त्यांचा अर्थ आजच्या स्त्री–मुक्तीच्या संदर्भात लावण्याचा प्रयत्न केल्यास समानतेचा ध्यास घेणारी, वैयक्तिक स्वातंज्याचा प्रश्न मांडणारी, स्व–शोधासाठी भक्तिमार्गाची वाट चोखाळणारी मध्ययुगीन स्त्री यातून दिसते.

संदर्भग्रंथ–

१) खडपेकर विनया : स्त्री स्वातंज्यवादिनी.
२) खाडिलकर उषा : स्त्रीमुक्ती कुतुहल.
३)खिवसरा मंगला : स्त्रीमुक्ती चळवळ आणि वृत्तपत्रांचा संदर्भ.
४) चिटणीस कृ.ना. : मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था.
५) डॉ. देशमुख शारदा : शिव काळातील व पेशवाईतील स्त्रीजीवन.
६) नानिवडेकर मेघा : महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा.
७) डॉ.पाटील लिला : भारतीय स्त्रीजीवन.